अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांच्या शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती / वैयक्तिक मान्यता / समायोजनाबाबत.

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः एसएसएन-२०१५/प्र.क्र.२०/१५/टीएनटी-२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १३ जुलै, २०१६

**<u>वाचा</u> :** १) शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्र.अशैसं-२०८/४४७/प्र.क्र.५६/०८/का.१, दि.४.५.२००९

**<u>प्रस्तावना</u>**

शाळांतील विद्यार्थी पटसंख्येच्या आधारावर शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाल्यास शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरतात व त्यांचे समायोजन महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, नियम २६ अन्वये बिंदु नामावलीनुसार व विषय साधर्म्यानुसार अन्य शाळेतील रिक्त पदावर करण्यात येते. अल्पसंख्याक संस्थांच्या शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरल्यास त्या कर्मचाऱ्यांचे त्याच धर्माच्या / भाषेच्या अन्य अल्पसंख्यांक संस्थेच्या शाळेमध्ये समायोजन करण्यात येत होते.

२. तथापि सर्वोच्च न्यायालयाचे अहमदाबाद सेंट झेविअर्स कॉलेज सोसायटी विरुद्ध गुजरात राज्य (AIR १९७४ SC १३८९) आणि T.M.A. Pai Foundation vs State of Karnataka २००२ (८) SCC ४८१ तसेच सेक्रेटरी मलनकारा सिरीयन कॅथेलिक कॉलेज विरुद्धी टी.जोस व इतर (२००७ ) १ SSC ३८६ यामधील न्यायनिर्णय तसेच सदर न्यायनिवाड्याच्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालय, मुंबई , खंडपीठ नागपूर व इतर राज्यातील उच्च न्यायालयांनी दिलेल्या न्यायनिर्णयानूसार सर्व अल्पसंख्यांक संस्थांना स्वत:ची संस्था सुरु करण्याचा व त्याचे प्रशासन चालविण्याचा भारतीय राज्यघटना कलम ३०(१) नूसार मूलभूत अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यामुळे सदर अल्पसंख्यांक संस्थांमध्ये समायोजनाद्वारे कर्मचारी उपलब्ध करुन देणे ही त्यांच्या मूलभूत अधिकारास बाधा आणणारी बाब आहे. भारतीय राज्य घटनेनुसार मुलभूत हक्कांपैकी धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्यांक संस्थांबाबत बाबत कलम ३०(१ ) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे. "धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा हक्क असेल".

३. यास्तव सदर तरतूद व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अनुसरुन अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थामधील कर्मचारी निवडण्याबाबत /त्यांच्या पदभरतीबाबत/ वैयक्तिक मान्यतेबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय :

अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थामधील कर्मचारी वर्ग निवडण्याबाबत / पदभरतीबाबत/ वैयक्तिक मान्यतेबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. सर्व धार्मिक किंवा भाषिक **आधारावर अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमधील** सर्व अतिरिक्त शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची स्वतंत्र यादी तयार करावी.
२. प्रथमत: अशा अतिरिक्त शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे त्याच अल्पसंख्यांक संस्थेच्या अन्य शाळेतील रिक्त पदावर समायोजन करण्यात यावे.
३. अल्पसंख्याक संस्थांना आरक्षणाचे तत्व लागू नसल्याने अ.क्र. २ नुसार कार्यवाही केल्यानंतर संबंधित अतिरिक्त शिक्षकांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये बिंदुनामावलीनुसार व विषयाच्या आवश्यकेनुसार समायोजन करण्यात यावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये समायोजन करताना आरक्षण कायद्याचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी व त्यासाठी आवश्यकता असल्यास संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचे जात-वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय असे समायोजन करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. आरक्षण धोरणाचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास आरक्षण धोरणातील कायद्यानुसार दंडात्मक कारवाई अथवा तुरुंगवास किंवा दोन्हीची कारवाई करण्यात यावी.
४. एखाद्या अल्पसंख्यांक संस्थेमध्ये अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत समायोजन केल्यानंतर सदर अल्पसंख्यांक शाळेत पुढील काळात विद्यार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे भविष्यात जादा शिक्षक कर्मचाऱ्यांची आवश्यकता निर्माण झाल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत समायोजित झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवा मूळ संस्थेकडे वर्ग करण्यात याव्यात.
५. उपरोक्त प्रमाणे रिक्त पद उपलब्ध नसल्यास त्याच धार्मिक अथवा भाषिक अन्य अल्पसंख्यांक संस्थेच्या शाळेमध्ये त्या संस्थेच्या इच्छेनुसार समायोजन करण्यात यावे.
६. ऐच्छिक समायोजनास सदर संस्था तयार नसल्यास अशा सर्व अल्पसंख्याक संस्थांनी केलेल्या पद भरतीस महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७ कलम ५ (१) मधील तरतूदीमधून वगळण्यात यावे. सदर तरतूद मा. सर्वोच्च न्यायालय व काही राज्यांच्या उच्च न्यायालयांच्या न्यायनिवाड्यानुसार भारतीय राज्यघटना कलम ३० (१) च्या तरतूदीस बाधा येत असल्याने सदर अल्पसंख्याक संस्थांनी केलेल्या पद भरतीस वैयक्तीक मान्यता देण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

७. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करत असताना अल्पसंख्याक संस्थांमधील **अतिरिक्त ठरलेल्या ज्या कर्मचाऱ्यांचे समायोजन होणार नाही त्यांचे समायोजन होईपर्यंत** त्यांना विनाकाम विनावेतन (No Work No Pay) या तत्वाच्या आधारे त्यांना वेतन अदा करण्यात येवू नये. तथापि अशा अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे भविष्यात समायोजन झाल्यास त्यांना वेतन संरक्षण देण्यात यावे. परंतु अतिरिक्त असलेल्या कालावधीतील वेतनाची थकबाकी कुठल्याही परिस्थितीत अनुज्ञेय राहणार नाही.

८. ज्या अल्पसंख्यांक संस्थांनी रिक्त पदावरील पदभरतीस परवानगी मागितली आहे, त्यांस उक्त नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन परवानगी देण्यात यावी अथवा ना-हरकत प्रमाणपत्र न घेता अशी पदभरती केली असल्यास अशा पदभरतीस वैयक्तिक मान्यता देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

९. उपरोक्त प्रमाणे पदभरती करताना अथवा वैयक्तिक मान्यता प्रदान करताना खालील बाबींचे कटाक्षाने पालन करणे बंधनकारक राहील.

अ) रिक्त पदांची निश्चिती संबंधित शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेनूसार केली आहे याची तपासणी करावी.

आ) संबंधित संस्थेने प्रतिष्ठित वृत्तपत्रात जाहिरात दिली आहे किंवा कसे यांची तपासणी करुन वृत्तापत्राची मूळ प्रत तपासावी. जाहिरातीमध्ये संचमान्यतेनुसार व उपलब्ध कार्यभारानुसार पदांचा उल्लेख केला आहे किंवा कसे, त्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता (माध्यम व विषय), वयोमर्यादा, पद पुर्णवेळ/अर्धवेळ/घड्याळी तास/ रजा कालावधी इ. तपशील. पद अनुदानित /अंशत: अनुदानित /विना अनुदानित असल्याचा तपशील. पदांचे मानधन व वेतनश्रेणी आणि संचमान्यतेनुसार पदासाठी उपलब्ध कार्यभार इ.बाबींची तपासणी करण्यात यावी.

इ) उमेदवारास नियुक्ती देताना महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, मधील नियम ९ नूसार झालेली असेल याची काटेकोरपणे काळजी घेण्यात यावी. तथापि अल्पसंख्यांक संस्थास आरक्षण धोरण लागू नसल्याने बिंदूनामावलीची आवश्यकता नसावी.

ई) पद रिक्त होण्याचे कारण नमूद करण्यात आलेले असावे. याव्यतिरिक्त वस्तुस्थितीशी विसंगत तपशील देऊन नेमणूक केलेली असल्याचे आढळल्यास संबंधित वैयक्तिक मान्यता तात्काळ रद्द करुन सदर कर्मचाऱ्याने दरम्यानच्या कालावधीत केलेल्या कामाचे वेतन संबंधित संस्थेने देणे बंधनकारक राहील.

उ) वैयक्तिक मान्यता प्रदान करताना संबंधित कर्मचाऱ्याचा हजेरीपटावरील (मस्टरवरील) उपस्थितीचा तपशील, कर्मचाऱ्याने घेतलेल्या मानधन/वेतनाचा तपशील इ. बाबींची देखील तपासणी करण्यात येईल.

१०. संस्था /शाळांमध्ये पायाभूत पेक्षा वाढीव पद निर्माण होत असल्यास त्यास शासनाच्या मान्यतेशिवाय मान्यता देण्यात येऊ नये, याची कृपया नोंद घेण्यात यावी. तसेच सदर पद कोणत्याही परिस्थितीत संस्थांनी /शाळांनी भरु नये. कोणत्याही परिस्थितीत पायाभूत पेक्षा वाढीव पदास शासनाच्या मान्यतेशिवाय परवानगी देण्यात येऊ नये.

११. याशिवाय शैक्षणिक संस्था /शाळांमधील पदभरतीस बंदी, समायोजन व इतर बाबत शासनाने वेळोवेळी काढलेले सुधारित निर्णय /नियम (ज्यामध्ये अल्पसंख्यांक संस्थांना वगळलेले नाही ) अल्पसंख्यांक संस्थांना लागू राहतील.

१२. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७ कलम ५ (१) व नियमावली १९८१, नियम (२५), (२६) मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्याची कार्यवाही यथावकाश करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७१३१७२३३४८७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO

Digitally signed by KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS,CID - 920022, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO
Date: 2016.07.15 10:35:30 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय
२) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
३) आयुक्त,शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) आयुक्त, क्रीडा, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे
६) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
७) संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
८) संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे
९) शिक्षण संचालक, (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे

१०) अध्यक्ष,महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

११) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई

१२) मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई

१३) मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

१४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

१५) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे

१६) कार्या.टीएनटी-१, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७ व नियमावली १९८१ मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्याची कार्यवाही करावी.)

१७) निवड नस्ती(टिएनटी-२)